महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे - ४११००१.
Web : www.dhepune.gov.in E-mail : dhepune@yahoo.co.in
फोन नं. ०२०/२६१२६९३९ फॅक्स नं. ०२०/२६१११११५३

क्र. उशिसं/शिष्यवृत्ती/२०१४-१५/१४ अई/ 3992 दिनांक : 22 APR 2015

प्रति,
१) सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण,
पुणे,मुंबई, जळगांव, औरंगाबाद, नांदेड, नागपूर, अमरावती,पनवेल,कोल्हापूर,सोलापूर.

२) कुलसचिव,
सर्व अकृषी विद्यापीठे.

विषय: उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या अखत्यारीतील शासकीय/अशासकीय, अनुदानित/कायमविनाअनुदानित महाविद्यालये/संस्थांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आधार क्रमांकाची नोंदणी करणेबाबत.

संदर्भः शासन पत्र क्रमांक टीईएम-२०१४/१३९६/प्र.क्र.२७२/तांशि-४ दिनांक २०.०३.२०१५.

उपरोक्त विषयाबाबतच्या संदर्भिय पत्रास अनुसरुन कळविण्यात येते की, Unique Identification Authority of India (UIDAI) यांचेकडून देशातील प्रत्येक व्यक्तीस त्याची ओळख पटविण्यासाठी विशिष्ठ आधार क्रमांक वितरीत करण्यात येतो. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीची स्वतंत्र ओळख तयार होऊन त्याची पुनरावृत्ती (Duplication) टाळणे शक्य होते.सदर आधार क्रमांक हा अधिकृत पुरावा मानलेला आहे. त्यामुळे केंद्रशासनाने आधार क्रमांकाचा वापर **शिष्यवृत्ती,** एलपीजी, पेन्शन, पासपोर्ट इत्यादी क्षेत्रांमध्ये मोठया प्रमाणात करण्यात यावा यासाठी सूचना दिलेल्या आहेत. या क्रमांकाव्दारे सदर योजनांची अंमलबजावणी अधिक चांगल्या पध्दतीने करणे शक्य होईल.

उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये शिक्षण घेणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याचा तपशिल Data on Click पध्दतीने तात्काळ उपलब्ध होण्याच्या दृष्टीने आणि विविध योजनांतर्गत लाभार्थी विद्यार्थ्यांना अचूकपणे लाभ देण्याच्या उद्दीष्टाने आधार क्रमांकाची व त्यांच्या बँक खात्याची नोंद करणे आवश्यक आहे. **त्यामुळे आपल्या विभागांतर्गत सर्व शासकीय/अशासकीय, अनुदानित/कायम विनाअनुदानित महाविद्यालये/संस्थांच्या प्राचार्य/संचालक यांनी व्यक्तीशः लक्ष घालून महाविद्यालय/संस्था स्तरावर विद्यार्थ्याच्या आधार क्रमांकाची नोंदणी करण्यासाठी संबंधित यंत्रणेशी संपर्क साधून विशेष मोहिम राबविण्याबाबतच्या तसेच सर्व विद्यार्थ्यांची बँक खाते क्रमांकासह संपूर्ण माहिती ही संबंधित विद्यार्थ्याच्या आधार क्रमांकाशी संलग्नित करण्याबाबतच्या सूचना त्वरीत देण्यात याव्यात.**

सदरची कार्यवाही तीन महिन्याच्या कालावधीमध्ये पूर्ण करावयाची आहे. त्यामुळे याबाबतच्या सूचना त्वरीत देण्यात याव्यात व सदर कार्यवाहीसाठी महाविद्यालयांकडे पाठपुरावा करण्यात यावा व याबाबतचा अनुपालन अहवाल या संचालनालयास सादर करावा.

(डॉ.व्ही.आर.मोरे)
सहसंचालक,
उच्च शिक्षण संचालनालय,पुणे-१

प्रत : डॉ. किरण पाटील, उप सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग मंत्रालय,विस्तार भवन मुंबई – ३२. यांना माहितीस्तव सादर.